# बावधन पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड

**प्रेसनोट** ता. १५/१२/२०२४

## तिर्थ फिल्डस, सुस येथील एन एच ७ या म्युझिक फेस्टीवल परवाणगी बाबत

बावधन पोलीस ठाणे हद्दीत तिर्थ फिल्डस, सुस या ठिकाणी असलेल्या जागेत दिनांक १४ डिसेंबर व १५ डिसेंबर रोजी दुपारी ०२ वा. ते १० वा. पर्यत अशी दोन दिवस नॉडविन गेमिंग यांचे वतिने एन एच ७ विकएन्डर_या म्युझिकल फेस्टीवलसाठी कार्यक्रमाचे आयोजक श्री गिरीष शिंदे यांनी परवाणगी मागितली होती.

सदर कार्यक्रमाबाबत कार्यक्रमाचे आयोजक यांना सुमारे दोन महिण्यापुर्वी बावधन पोलीस स्टेशन व मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२ कार्यालय यांचेकडुन तिर्थ फिल्डस, सुस या ठिकाणी घेण्यात येणा-या एन एच ७ विकएन्डर_या म्युझिकल फेस्टीवलसाठी खालील कारणात्सव परवाणगी देता येणार नसल्याबाबत तोंडी कळविण्यात आले होते.

सदर ठिकाणी मोठया प्रमाणात रहिवासी भाग असल्याने, जेष्ठ नागरिक व आयटी क्षेत्रात काम करणारे राहत असल्याने, मुंबई बँगलोर हायवे पासुन ते तिर्थ फिल्डस, सुस पर्यत एकेरी वाहतुकीमळे वाहतुक कोंडी होत असल्याने, यापुर्वी अशाच एका म्युझिकल प्रोग्राम वेळी खुप काळ वाहतुक कोंडी होवुन नागरिकांना त्रास झाला होता. कार्यक्रम परीसर हा उंचावर असल्याने व बाजुला असलेल्या रहिवासी भागात म्युझिक फेस्टीवल मधील लाउडस्पिकर च्या आवाजाने व एलईडी लाईटमुळे सार्वजनिक उपद्रव निर्माण होईल म्हणुन परवाणगी देता येणार नाही असे कळविले होते.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२, मा. पोलीस उप आयुक्त, वाहतुक व मा.सहा. पोलीस आयुक्त वाकड यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी भेट देवुन वरील कारणात्सव परवाणगी देणे शक्य नसल्याबाबत सांगीतले होते. पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांनी आयोजकांना ०२ डिसेंबर रोजी व विशेष शाखा, पोलीस आयुक्त कार्यालयाकडुन दिनांक ११ डिसें. २०२४ रोजी परवाणगी नाकारल्याबाबत लेखी कळविण्यात आलेले होते.

तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडुनही लिकर परवाणा देण्यात आलेला नाही. जागा मालक यांनीही आयोजक यांना प्रशासनाची परवाणगी असल्याखेरीच कार्यक्रम घेता येणार नाही असे कळविले होते.

या ठिकाणाचे व्यतिरीक्त वाहतुक कोंडी होणार नाही व सर्वसामान्य नागरीकांना उपद्रव होणार नाही अशा **Pune International Exhibition and Convention Centre (PIECC)** ग्राउंड मोशी या ठिकाणी कार्यक्रम घेण्यास सुचविण्यात आलेले होते.

अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणारे आयोजकांना आवाहन करण्यात येते की, प्रेक्षकांना त्रास होवु नये म्हणुन कार्यक्रमाचे ठिकाण घोषित करण्यापुर्वी पोलीस विभागाशी समन्वय साधुन ठिकाण निश्चित करावे. असे कार्यक्रम घेण्यास पोलीस प्रशासन आयोजकांना नेहमीच योग्य ते कायदेशिर सहकार्य करील.

(अनिल विभुते)
वरीष्ठ पोलीस निरीक्षक,
बावधन पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड